# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : १२ फेब्रुवारी २०१९

## ( बैठक क्र. २११ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | पशुआरोग्य सेवा देण्यासाठी मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना | पदुम |
| २ | सहकारी सूतगिरण्यांच्या मदतीसाठी सरकारकडून आकृतीबंधात सुधारणा | वस्त्रोद्योग |
| ३ | दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत मिळणार आकस्मिकता निधीत दोन हजार कोटींची वाढ | वित्त |
| ४ | राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची राज्यात अंमलबजावणी करणार | ग्राम विकास |
| ५ | पुण्याच्या स्पाईसर युनिव्हर्सिटीवर कारवाई होणार | उच्च व तंत्र शिक्षण |
| ६ | लाच प्रकरणातील दोषी अधिकाऱ्याचे सेवानिवृत्तीवेतन काढून घेण्याचा निर्णय | महसूल |
| ७ | नागपूर-अमरावती विभागातील  नझूल जमिनी फ्री-होल्ड करण्यास मान्यता | महसूल |

**पशुआरोग्य सेवा देण्यासाठी**
**मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना**

राज्याच्या दुर्गम, डोंगराळ, आदिवासीबहुल भागामधील पशुपालकांकडील पशुरुग्णांसाठी २०१८-१९ या वर्षापासून मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना सूरु करण्यास तसेच या योजनेच्या पहिल्या टप्प्यात ८० तालुक्यांमध्ये फिरते पशुचिकित्सा पथक सुरु करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्याच्या दुर्गम भागात राहणाऱ्या पशुपालकांना आपल्या पशुरुग्णांवरील उपचारासाठी बऱ्याचदा आर्थिक भार परवडणारा नसतो. त्यामुळे पशुवैद्यकीय सेवेअभावी पाळीव जनावरांचा मृत्यू होऊ शकतो. तसेच केंद्र शासनाने लाळखुरकुत रोगमुक्त प्रदेशासाठी महाराष्ट्र राज्याची निवड केलेली आहे. त्यामुळे पशुरोगांचे प्रभावी नियंत्रण करणे आवश्यक आहे. या बाबी विचारात घेऊन, राज्याच्या दुर्गम भागासह पशुधनाच्या तुलनेत पशुवैद्यकीय दवाखान्याची संख्या कमी आणि दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधा असणाऱ्या तालुक्यांमध्ये मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत प्रथम टप्प्यात ८० तालुक्यांमध्ये फिरते पशुचिकित्सा पथक सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या फिरत्या पशुचिकित्सा पथकासाठी विशेष तयार केलेली ८० वाहने आणि आवश्यक ती उपकरणे खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पथकांसाठी उपलब्ध मनुष्यबळातून पशुवैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल. मात्र, मनुष्यबळ कमी असल्यास ठराविक कालावधीसाठी सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची प्रचलित धोरणानुसार मानधनावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच वाहन चालक तथा मदतनीस ही पदे एकत्रित वेतनावर प्रचलित धोरणानुसार बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात येतील. पथकामधील ८० वाहनांसाठी १२ कोटी ८० लाख रुपये एवढा अनावर्ती खर्च तसेच या पथकासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळ (वाहन चालक कम मदतनीस), वाहन दुरुस्ती व देखभाल, इंधन आणि औषधी खरेदी इत्यादींसाठी तीन कोटी ९४ लाख रुपये एवढा आवर्ती खर्च अशा एकूण १६ कोटी ७४ लाख एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

वस्त्रोद्योग विभाग

## सहकारी सूतगिरण्यांच्या मदतीसाठी
## सरकारकडून आकृतीबंधात सुधारणा

राज्यातील सहकारी तत्त्वावरील वस्त्रोद्योगास प्रोत्साहन देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या वस्त्रोद्योग धोरणात सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार सध्या असलेल्या १०:३०:६० या आकृतीबंधात सुधारणा करून तो ५:४५:५० असा करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे सभासद भागभांडवल कमी करून शासकीय भागभांडवल वाढविताना कर्जाचे प्रमाणही कमी करण्यात आले आहे. नव्या आकृतीबंधामुळे उत्तर महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या कापूस उत्पादक प्रदेशात सहकारी सूत गिरण्यांना मोठी मदत होणार आहे.

कृषी क्षेत्रानंतर सर्वात जास्त रोजगार निर्मितीची क्षमता वस्त्रोद्योगात आहे. त्यादृष्टीने राज्यातील वस्त्रोद्योगास चालना देण्यासाठी राज्य सरकारने गेल्या वर्षी वस्त्रोद्योग धोरणास मान्यता दिली आहे. या धोरणात सहकारी सूत गिरण्यांसाठी अर्थसहाय्याचा सध्याचा आकृतीबंध १०:३०:६० असा आहे. त्यात सभासद भागभांडवल १० टक्के, शासकीय भागभांडवल ३० टक्के आणि कर्ज ६० टक्के असे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. या आकृतीबंधात सुधारणा करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्यानुसार हा आकृतीबंध सुधारित करून सभासद भागभांडवल ५ टक्के, शासकीय भाग भांडवल ४५ टक्के व कर्ज ५० टक्के (५:४५:५०) या प्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली. मात्र, त्यासाठी काही अटी निश्चित करण्यात आल्या असून त्यात सूतगिरणी स्थापन करण्यात येणाऱ्या तालुक्यामध्ये गेल्या १० वर्षात सरासरी किमान ५० टक्के क्षेत्रावर कापसाची लागवड असावी, गेल्या पाच वर्षात त्या ठिकाणी सातत्याने कापसाचे उत्पादन असावे आणि या तालुक्यात एकही सूतगिरणी सध्या कार्यरत नसावी आदींचा समावेश आहे. तसेच मानव विकास निर्देशांक कमी असणाऱ्या जिल्हे व तालुक्यांचा या निर्णयात समावेश करण्यात आला आहे.

----०-----

वित्त विभाग

<u>दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत मिळणार</u>

## आकस्मिकता निधीत दोन हजार कोटींची वाढ

राज्यात २०१८ च्या खरीप हंगामातील नैसर्गिक परिस्थितीमुळे १५१ तालुक्यांत दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. या तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना शेतीपिकाच्या नुकसानीपोटी तातडीने मदत वाटप करण्यासाठी २ हजार कोटींचा आकस्मिकता निधी अग्रीमाद्वारे उपलब्ध करुन देण्यास मंत्रिमंडळाकडून मान्यता देण्यात आली. यासाठी राज्याच्या आकस्मिक निधीच्या १५० कोटी इतक्या कायमच्या मर्यादेत २ हजार कोटींनी तात्पुरती वाढ करून ती २ हजार १५० कोटी इतकी करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

राज्यातील १५१ तालुक्यांमध्ये गंभीर आणि मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यातील शेतकऱ्यांना शेती पिकाच्या नुकसानीबद्दल तातडीने मदत वाटप करण्यासाठी २ हजार कोटी इतका अतिरिक्त निधी आकस्मिक निधी अग्रिमाद्वारे उपलब्ध करून देणे आवश्यक होते. त्यानुसार आज निर्णय घेण्यात आला.

-----०-----

## राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची
## राज्यात अंमलबजावणी करणार

केंद्र शासनाची राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना **२०१८-१९** पासून संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून तिच्या माध्यमातून जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीतील सदस्यांना प्रशिक्षण देण्यासह लोकप्रतिनिधी म्हणून त्यांच्या क्षमता वाढीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून **६०:४०** या प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे.

राज्यात या अभियानांतर्गत प्रशिक्षण व क्षमताबांधणीचा प्रमुख कार्यक्रम हाती घेण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक ती यंत्रणा निर्माण करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांचे सनियंत्रण करण्यासाठी राज्यस्तरावर राज्य व्यवस्थापन कक्ष-पंचायतराज आणि जिल्हा स्तरावर जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचे निवडून आलेले सदस्य आणि थेट निवडून आलेले सरपंच यांच्यासाठी निवडणुकीनंतरच्या ६ महिन्यात प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रम घेतला जाईल. यासोबतच जिल्हा आणि तालुका स्तरावरील अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामसेवक यांचे प्रशिक्षण व क्षमता बांधणीचे कार्यक्रमही नियमितपणे घेण्यात येणार आहेत.

क्षमता बांधणी व प्रशिक्षण कार्यक्रम सुरळीतपणे आणि गुणवत्तापूर्ण होण्यासाठी राज्यस्तरावर पुणे येथील यशदा संस्थेत राज्य पंचायत संसाधन केंद्र (SPRC) स्थापन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा पंचायत संसाधन केंद्र (DPRC) स्थापन करण्यात येणार आहे. जिल्हा पंचायत संसाधन केंद्रांच्या इमारत बांधकामासाठी प्रत्येकी २ कोटीपर्यंतचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्रामपंचायतींना तांत्रिक सल्ला देण्यासाठी तालुका स्तरावर प्रत्येकी दोन तांत्रिक व्यक्ती नियुक्त करण्यात येतील. या अभियानांतर्गत कार्यालय इमारत नसलेल्या ग्रामपंचायतींना इमारत बांधकामासाठी निधी तसेच नादुरुस्त व मोडकळीस आलेल्या ग्रामपंचायत इमारतींच्या दुरुस्तीसाठी निधी देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे नागरी सुविधा केंद्रासाठी स्वतंत्र खोली नसणाऱ्या ग्रामपंचायतींना खोली बांधकामासाठी निधी देण्यात येणार आहे.

पेसा क्षेत्रामध्ये समावेश असलेल्या १३ जिल्ह्यांतील ५९ तालुके व  २८९० ग्रामपंचायतींच्या क्षमता बांधणी व इतर उपक्रमांसाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण, गावस्तरीय कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, ग्रामसभा बळकटीकरणाचे उपक्रम इत्यादींसाठी निधी दिला जाईल. पेसा क्षेत्रातील जिल्हे व तालुक्यांसाठी प्रत्येकी एक पेसा समन्वयक व प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी पेसा मोबिलायझर असे मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. याशिवाय योजनेंतर्गत माहिती, शिक्षण, संवाद आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी निधी उपलब्ध होणार आहे.

-----o-----

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## पुण्याच्या स्पाईसर युनिव्हर्सिटीवर कारवाई होणार

विविध स्वरुपाची अनियमितता आणि इतर कारणांमुळे पुणे येथील स्पाईसर ॲडव्हेन्टिस्ट युनिव्हर्सिटी या विद्यापीठाविरोधात कारवाई करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मात्र, या विद्यापीठात २०१४-१५ आणि २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी त्यांचे प्रवेश नियमित करण्यासही मान्यता देण्यात आली.

एशलॉक एज्युकेशन संस्थेच्या स्पाईसर ॲडव्हेन्टिस्ट युनिव्हर्सिटी या स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठास १८ मे २०१६ ला शासन मान्यता देण्यात आली तर २६ जुलै २०१६ रोजी राजपत्रात विद्यापीठ कार्यान्वीत झाल्याची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. पण त्यापूर्वीच विद्यापीठाने २०१४-१५ आणि २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना प्रवेश दिला होता. प्रवेश देताना विविध स्वरुपाच्या अनियमितता आणि उणिवांमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे विद्यापीठ यापुढे सुरू ठेवणे योग्य होणार नसल्याने स्पाईसर ॲडव्हेन्टिस्ट युनिव्हर्सिटी अधिनियम-२०१४ मधील कलम ४७ नुसार या विद्यापीठाविरोधात कारवाई करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच या उणिवा विद्यापीठ आयोगाच्या निदर्शनासही आणून देण्यात येणार आहेत. याबरोबरच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी या विद्यापीठाच्या अधिनियमातील कलम ५१ मध्ये सुधारणा करण्यासह नवीन कलम ५२ समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात आली.

-----o-----

महसूल विभाग

## लाच प्रकरणातील दोषी अधिकाऱ्याचे सेवानिवृत्तीवेतन काढून घेण्याचा निर्णय

जालना येथे तत्कालीन तालुका भूमी अभिलेख निरीक्षक बाबुराव नानासाहेब आर्दड यांना लाच घेतल्याप्रकरणी उच्च न्यायालयाने दोषी ठरविल्याने दोषी ठरविलेल्या दिनांकापासून त्यांचे संपूर्ण सेवानिवृत्तीवेतन काढून घेण्याचा निर्णय मंत्रिमंडळाकडून घेण्यात आला.

उच्च न्यायालयाने श्री. आर्दड यांना २३ सप्टेंबर २०१५ च्या निर्णयानुसार दोषी ठरवून सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. शासकीय कर्मचाऱ्यावरील दोष सिद्ध झाल्यास त्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षेच्या समन्यायी तत्त्वानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

-----o-----

## नागपूर-अमरावती विभागातील
## नझूल जमिनी फ्री-होल्ड करण्यास मान्यता

नागपूर व अमरावती विभागातील लिलावाद्वारे अथवा अन्य प्रकारे भाडेतत्त्वावर दिलेल्या नझूल जमिनी भोगवटादार वर्ग-१ (फ्री-होल्ड) करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. नझूल जमिनी फ्री-होल्ड करण्यासाठीचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

निवासी, वाणिज्यिक आणि औद्योगिक प्रयोजनासाठी तत्कालीन मध्य प्रांत आणि बेरार भागात लागू असलेल्या कायद्यानुसार नागपूर व अमरावती या महसुली विभागात मोठ्या प्रमाणात नझूल जमिनी भाडेपट्ट्याने दिल्या होत्या. करारात नमूद अटी आणि शर्तींनुसार भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करण्यात येते. या जमिनीच्या भाडेपट्ट्यात १ ऑगस्ट २०१४ च्या शासन निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने भाडेकराराच्या नूतनीकरणात उदासिनता दिसून येत होती. त्यामुळे या शासन निर्णयात सुधारणा करण्यासह भूईभाडे दर कमी करून सुधारित धोरण निश्चित करण्यात आले होते. तरीदेखील भाडेपट्ट्यांच्या नूतनीकरणास प्रतिसाद मिळत नव्हता. त्यासोबतच या जमिनीचे मालकी हक्क देण्याची वारंवार मागणी होत होती. त्यामुळे या जमिनी फ्री-होल्ड करण्याबाबत शिफारस करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती. या समितीने जमिनी फ्री-होल्ड करण्याची शिफारस केली होती.

नझूल भाडेपट्टे फ्री-होल्ड करताना निवासी प्रयोजनासाठी जमिनीच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दरानुसार होणाऱ्या बाजारमुल्याच्या ५ टक्के आणि वाणिज्यिक व औद्योगिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनीच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराप्रमाणे होणाऱ्या बाजारमुल्याच्या १० टक्के रूपांतरण अधिमूल्य आकारण्यात येणार आहे. या उत्पन्नाचा वापर राज्याच्या पायाभूत विकासासाठी करण्यास मान्यता देण्यात आली. ही योजना ऐच्छिक स्वरूपाची असून सवलतीचा लाभ घ्यायचा नसेल त्या भाडेपट्टाधारकांना जुन्या भाडेपट्टा धोरणानुसार भाडेपट्टा पुढे सुरू ठेवता येणार आहे.

-----०-----